

श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली

एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

इयत्ता – चौथी (2 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस दुसरा :






**ब्रीज कोर्ससोबत चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट (वापरणे सक्ती नाही.)**

कविता समजून घ्या व तालासुरात म्हणा.

टेस्ट सोडवा

सराव

## १. धरतीची आम्ही लेकरं

कविता पहा

- ऐका. म्हणा. वाचा.

धरतीची आम्ही लेकरं । भाग्यवान ।
धरतीची आम्ही लेकरं ।। ध्रु. ।।

शेतावर जाऊया । सांगाती गाऊया ।
रानीवनी गाती जशी रानपाखरं ।। १ ।।


मेहनत जिमनीवरी । केली वरीसभरी ।
आज आलं फळ त्याचं डुले शिवार ।। २ ।।

शाळु, जुंधळा मोती । चमचम चमकत्याती ।
मोत्यांची सालभरी खाऊ भाकर ।। ३ ।।

स्थापू समानता, पोलादी ऐक्यता ।
नाही धनी येथ कुणी, नाही चाकर ।। ४ ।।

धरतीची आम्ही लेकरं । भाग्यवान ।
धरतीची आम्ही लेकरं ।।

– द. ना. गव्हाणकर






टेस्ट सोडवा

## कोनाचे प्रकार समजून घ्या.


**काटकोन, लघुकोन, विशालकोन**



खिडकीच्या लगतच्या दोन कडांमध्ये काटकोन दिसतो.




पुस्तकाच्या लगतच्या दोन कडांमध्ये काटकोन दिसतो.





प्रत्येक घड्याळात ३ वाजता व ९ वाजता तासकाटा व मिनिटकाटा एकमेकांशी काटकोन करतात.



बाजूच्या चित्रात दाखवल्याप्रमाणे कात्रीच्या दोन पात्यांमध्ये **काटकोन** आहे.



या कात्रीच्या दोन पात्यांच्या टोकांमधील अंतर हळूहळू कमी केले असता होणारा कोन हा काटकोनापेक्षा लहान होत जातो. काटकोनापेक्षा लहान कोनाला **लघुकोन** म्हणतात.



कात्रीच्या दोन पात्यांच्या टोकांमधील अंतर हळूहळू वाढवले असता होणारा कोन हा काटकोनापेक्षा मोठा होत जातो. काटकोनापेक्षा मोठ्या कोनाला **विशालकोन** म्हणतात.



काटकोन



लघुकोन




विशालकोन

टेस्ट सोडवा

## Understand the angles.


**Right angle, acute angle, obtuse angle**



We see a right angle between two adjoining sides of a window.



Two adjacent sides of a book make a right angle.




In a clock, at 3 o'clock and 9 o'clock, the minute hand and the hour hand are at right angles to each other.



In the picture alongside, there is a **right angle** between the two blades of the scissors.



As we reduce the distance between the tips of the blades, little by little, the angle between the blades grows smaller than a right angle.
An angle which is smaller than a right angle is called an **acute angle**.



But, as we increase the distance between the tips of the blades the angle between the blades grows bigger than a right angle.
An angle that is bigger than a right angle is called an **obtuse angle**.



**A right angle**



**An acute angle**



**An obtuse angle**

An Action Song

Unit One

टेस्ट सोडवा

**Listen and repeat. Read aloud and sing.**
कविता ऐका आणि म्हणा. मोठ्याने वाचा आणि चालीवर म्हणा.

## Revision





... join hands together



... clap hands together

We'll all join in a circle,
We'll all join in a circle,
We'll all join in a circle,
And sing a song or two.
...
We'll all sit down together,
We'll all sit down together,
We'll all be quiet together,
Now our singing is through.

वील् 'ऑऽल् 'जॉइन् इन् अ 'सऽकल्
ॲन् 'सिंग् अ 'साँग् ऑर् 'टू

वील् 'ऑऽल् बी 'क्वायट् टु'गेदऽ
नाव् आवर् 'सिंगिंग् इझ् 'थ्रूऽ



... dance together



... turn round together



... sit down together



... be quiet together

मुलांचे गट करून किंवा पूर्ण वर्गाला गोलात उभे करून हे गाणे चालीवर म्हणून घ्यावे. पहिल्या कडव्यातील 'join in a circle' ऐवजी चित्रांत दाखवलेले तसेच इतर पर्याय वापरावे. वेगवेगळ्या 'actions' ची वेगवेगळी कडवी झाल्यावर शेवटचे कडवे घ्यावे.

टेस्ट सोडवा

## १. प्राण्यांचा जीवनक्रम


वाचा व समजून घ्या.

### कोंबडीच्या पिल्लांचा अंड्यांतून जन्म

मुंग्या, फुलपाखरे, मासे, बेडूक, साप हे सर्व प्राणी अंडी घालतात. या प्राण्यांची अंडी सहसा आपल्या पाहण्यात येत नाहीत. काही अगदी चिंटुकल्या प्राण्यांची अंडी खूप लहान असतात. ती तर आपल्याला सहजासहजी दिसणारही नाहीत. म्हणून हे प्राणी अंडी घालतात हे आपल्या लक्षात येत नाही.

पण कोंबडी अंडी घालते हे आपल्याला नक्की माहिती असते.


कोंबडीची अंडी सहज दिसू शकतील इतपत मोठी असतात.



- **नवा शब्द शिका !**

अंडी उबवणे – अंड्यांना ऊब देण्यासाठी कोंबडीने अंड्यांवर बसून राहण्याला अंडी उबवणे म्हणतात.


कोंबडी अंडी घालते. अंड्यांमध्ये पिल्लांची वाढ होण्यासाठी उबेची गरज असते. त्यासाठी अंडी घातल्यानंतर कोंबडी अंड्यांवर बसून राहते व अंडी उबवते. अंड्यांमधील पिल्ले हळूहळू वाढू लागतात.





वाढ पूर्ण झाली, की पिल्लू अंड्याचे कवच फोडून बाहेर पडते.

पिल्ले थोडी मोठी होईपर्यंत कोंबडी त्यांची काळजी घेते.



### माहीत आहे का तुम्हांला

जेव्हा कोंबडी अंडी उबवत असते, तेव्हा ती अंड्यांच्या काळजीपोटी आक्रमक बनते. अंड्यांच्या जवळ कोणी गेले, तर ती त्याच्या अंगावर धावून जाते.

### जरा डोके चालवा

- कोंबडी आणि कोंबडीचे पिल्लू यांच्यात कोणकोणत्या बाबतींत सारखेपणा आहे ?

सराव

टेस्ट सोडवा

# १. शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र

शिवाजी महाराज थोर पुरुष होते. आपण दरसाल त्यांची जयंती मोठ्या समारंभाने आणि आदराने साजरी करतो. तुम्ही मुले तर त्या दिवशी किती आनंदात असता. महाराजांवर सुंदर सुंदर गाणी म्हणता, पोवाडे म्हणता, त्यांच्या तसबिरीला हार घालता. मोठ्या उत्साहाने 'शिवाजी महाराज की जय' असा महाराजांच्या नावाचा जयजयकार करता. कोण बरे हे शिवाजी महाराज? अशी कोणती मोठी कामगिरी त्यांनी केली?

शिवाजी महाराज ज्या काळात होऊन गेले, तो काळ मध्ययुगाचा होता. त्या काळी सर्वत्र राजेशाह्यांचा अंमल असे. बरेच राजे प्रजेच्या हिताऐवजी आपल्याच चैनविलासात मग्न असत; पण त्या काळातही असे काही राजे होऊन गेले, की ज्यांनी प्रजेच्या कल्याणासाठी राज्य केले. उत्तरेतील मुघल सम्राट अकबर, दक्षिणेतील विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय हे आपल्या कल्याणकारी राजवटींबद्दल इतिहासात प्रसिद्ध आहेत. त्यांच्याबरोबरच शिवाजी महाराजांचेही नाव गौरवाने घेतले जाते.

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्य निर्माण केले. स्वराज्य म्हणजे स्वत:चे राज्य. महाराजांपूर्वी सुमारे चारशे वर्षे महाराष्ट्रात स्वराज्य नव्हते. महाराष्ट्राचा बराचसा भाग अहमदनगरचा निजामशाहा आणि विजापूरचा आदिलशाहा या दोन सुलतानांनी आपसात वाटून घेतला होता. ते मनाने उदार नव्हते. ते प्रजेवर जुलूम करत होते. या दोघांचे एकमेकांशी हाडवैर होते. त्यांच्यात नेहमी लढाया होत. त्यात रयतेचे हाल होत. रयत सुखी नव्हती. उघडउघड उत्सव करणे, पूजा करणे धोक्याचे झाले होते. रयतेला पोटभर अन्न मिळत नव्हते. राहायला सुरक्षित निवाराही नव्हता. सगळीकडे अन्याय माजला होता. महाराष्ट्रात ठिकठिकाणी देशमुख, देशपांडे इत्यादी वतनदार होते, पण रयतेकडे त्यांचे लक्ष नव्हते. देशावर त्यांचे प्रेम नव्हते. प्रेम होते फक्त वतनावर, जहागिरीवर. वतनासाठी ते एकमेकांशी भांडत. आपापसात लढत. त्यात रयतेचे खूप हाल होत. या साऱ्या गोष्टींमुळे रयत त्रासून गेली होती. सगळीकडे अंदाधुंदी माजली होती.

शिवाजी महाराजांनी हे सारे पाहिले. रयतेला सुखी करण्यासाठी स्वराज्य स्थापण्याचे पवित्र कार्य त्यांनी हाती घेतले. भांडखोर वतनदारांना त्यांनी वठणीवर आणले. स्वराज्याच्या कामी त्यांचा उपयोग करून घेतला. तसेच रयतेवर अन्याय करणाऱ्या सत्तांशी शिवाजी महाराजांनी झुंज दिली. जुलमी राजवटींचा पराभव केला. न्यायाचे हिंदवी स्वराज्य त्यांनी स्थापन केले. हे स्वराज्य सर्व जातिधर्मांच्या लोकांचे होते. स्वराज्यात कोणताही भेदभाव नव्हता. शिवाजी महाराजांनी स्वराज्यात हिंदू, मुसलमान असा कोणताच भेदभाव केला नाही. सर्व धर्मांतील साधुसंतांचा त्यांनी सन्मान केला. अशी ही महाराजांची थोर कामगिरी पाहिली, की आपल्याला प्रेरणा मिळते, स्फूर्ती मिळते.

शिवाजी महाराजांपूर्वी सुमारे तीन-चारशे वर्षे महाराष्ट्रामध्ये अनेक संत होऊन गेले. त्यांनी केलेल्या कामगिरीचा शिवाजी महाराजांना स्वराज्यस्थापनेच्या कामी उपयोग झाला. संतांची ती कामगिरी आपण पुढील पाठात पाहू.

# माझा ऑनलाईन अभ्यास



## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे    वेब स्त्रोत-'ई-बालभारती'    सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर
https://www.gurumauli.in